# नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग

Head Office, Plot No.1, Palm Beach Rd, Sector 15, CBD Belapur, Navi Mumbai, Maharashtra 400614, India
Tel.no. 22 2756 7070 Email: nmmcedu@gmail.com


**महत्वाचे**

जा.क्र. नमुंमपा/शिक्षण विभाग/५०३/२०१७
दिनांक : ८ /०३/२०१७

प्रति,
मुख्याध्यापक,
विना अनुदानित/कायम विना अनुदानित
प्राथमिक शाळा (सर्व)
नवी मुंबई.

**विषय : अशासकीय शाळांमध्ये गणवेश व इतर शैक्षणिक साहित्य विशिष्ट दुकानातुन खरेदी करण्याची सक्ती न करण्याबाबत.**

संदर्भ : १) मा. अवर सचिव, मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे No.F.१२-५/२०१६-EE.८ दिनांक २१ डिसेंबर, २०१६ रोजीचे पत्र.
२) मा. उप संचालक, (प्रकल्प), म.प्रा.शि.प. मुंबई या कार्यालयाचे जा.क्र. मप्राशिप/सशिअ/गणवेश/२०१६-१७/४३१ दिनांक ०६ मार्च, २०१७ रोजीचे पत्र.
३) शासन निर्णय क्र माशाव्य १२०४ (११४/०४) माशि-३, दिनांक ११ जून, २००४ रोजीचे पत्र.

नवी मुंबई महानगरपालिका अंतर्गत कार्यक्षेत्रामध्ये सुरु असलेल्या कायम विना अनुदानित शाळा या शालेय गणवेश तसेच शालेय साहित्य विशिष्ट दुकानातुन खरेदी करण्याबाबत पालकांवर सक्ती करतात अशी तक्रार मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेकडे प्राप्त झाली आहे. त्यानुसार आवश्यक कार्यवाही करणेबाबत संदर्भ क्र.१ अन्वये केंद्र शासनाने कळविले आहे.

संदर्भ क्रमांक तीन च्या शासन निर्णयाद्वारे शाळातील विद्यार्थ्यांना गणवेश अथवा अन्य शैक्षणिक साहित्य शाळेच्या भांडारातून किंवा शाळेने वा व्यवस्थापनाने ठरवून दिलेल्या विशिष्ट दुकानातुन खरेदी करण्याची सक्ती पालकांवर / विद्यार्थ्यांवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या करता येणार नाही असे आदेश शासनाने पारीत केले आहेत. त्यामुळे कोणत्याही शाळेने अशी सक्ती पालक / विद्यार्थी यांचेवर करु नये. तसे निदर्शनास आल्यास आवश्यक ती कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

08/03/17

**(संदीप संगवे)**
**शिक्षणाधिकारी**
**नवी मुंबई महानगरपालिका**

**प्रत :**

१) **मा. उप संचालक (प्रकल्प), मप्राशिप, मुंबई यांना माहितीस्तव.**
२) Shri G.S. Chugh, Flat no.107/13, Koparkhairane CHS, Plot 20, Sector-11, Koparkhairane, Navi Mumbai यांना माहितीसाठी